द गुड बॅड अगली

राजू परुळेकर



**बाळासाहेबांनी शिवसेनेच्या माध्यमातून राजकीय असहिष्णुता महाराष्ट्रात आणली. ज्याला ते स्वतः कडवेपणा म्हणतात, त्या असहिष्णुतेचा आज वृक्ष झाला आहे.**

# शिवसेना 'आज व उद्या'

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा वाढदिवस खूप मोठ्या जोशात साजरा झाला. याप्रसंगी अगदी शिवसेनेची सत्ता राज्यात आणण्याबद्दल उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांना वचनही दिलं. यातला सारा भावनिकतेचा भाग आपण वजा करू. शिवसेनेचे, शिवसेनाप्रमुखांचे गुण आणि त्यांची महानता वर्णन करणारं बरंच लिहिलं गेलंय. (प्रस्तुत लेखकानेही इतरत्र ते कधी ना कधी लिहिलेलं आहेच.) आपल्याकडे मोठ्या माणसांबद्दल सतत चांगलं आणि स्तुतीपर लिहिण्याची परंपराच आहे, जणू काही त्यांच्यावर टीका केल्याने त्यांच्यात काही उणेपणा येईल असं त्यांच्या सभोवतीच्या लोकांना आणि त्यांना स्वतःलासुद्धा वाटतं. भारतात राजकीय सहिष्णुतेची परंपरा खऱ्या अर्थाने जवाहरलाल नेहरूंनी सुरू केली. 'विरोधक म्हणजे शत्रू नव्हे'. हे वाक्य आज चलनी नाण्यासारखं अनेक राजकारणी फेकत असतात, पण मनोमन त्याचा अर्थ नेमका कुणालाच आवडलेला नसतो. यासंबंधात लिहिण्यासारखं बरंच आहे, परंतु आजचा विषय शिवसेना हा आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेत हिंसक असहिष्णुता आधुनिक काळात प्रथम शिवसेनेने आणली. शिवसेनाप्रमुख एक्यांशी वर्षांचे झाले. त्यामुळे त्यांचे आता फक्त गुणच पाहायला हवेत असं अजिबात नाही. जर शरद पवारसाहेबांचे दोष आपण दाखवतो. ते शिवसेनेला आवडतंही. शिवसेनेचे आणि शिवसेनाप्रमुखांचे दोष कुणी दाखवायचे, असा प्रश्न उभा राहिला की मात्र हाताची घडी तोंडावर बोट घेण्याची काहीच गरज नाही. शिवसेनाप्रमुख आजही राजकीयदृष्ट्या सक्रिय आहेत. ते करतात ती विधानं नव्वद टक्के राजकीय असतात, तर त्यांच्याकडून चुका होत नाहीत असं मानून पुढे जाणं हे घातक आहे. समाज, लोकशाही, महाराष्ट्र या तिन्हींच्याही हे हिताचं नाही. मोठ्या माणसांच्या चुकाही मोठ्या असतात. त्याने समाजाचं अधिक मोठ्या प्रमाणावर नुकसान होतं. मोठ्या माणसांच्या चुकांमुळे सामान्य माणसांची आयुष्य अक्षरशः चिरडली जातात. त्यांना हुंदका देण्याचंही स्वातंत्र्य राहत नाही. त्यामुळेच कोणत्याही आणि कितीही मोठ्या माणसाला लोकशाही समाजात देवत्व बहाल करता कामा नये. नेहरूंना याची विलक्षण दृष्टी होती. त्या काळात काँग्रेसला

देशभर म्हणावा असा विरोधकच निर्माण झालेला नव्हता. निवडणुकांमध्ये देशभर काँग्रेसचा अक्षरशः अश्वमेध दौडायचा. नेहरूंनी स्वतःच एके ठिकाणी भीती व्यक्त केली होती की, ''मला मी हुकूमशहा होईन की काय अशी भीती वाटते!'' पण ते तसे झाले नाहीत. अपार कष्ट घेऊन त्यांनी भारतात लोकशाही रुजवली. स्वतःच्या अनेक राजकीय विरोधकांना, (खरं तर शत्रूंनासुद्धा) केवळ लोकशाही स्वतःमध्ये आणि देशामध्ये टिकावी म्हणून संसदेत आणि मंत्रिमंडळात नेहरूंनी स्थान दिलं. स्वतःला आणि स्वतःच्या सरकारला अचूक आणि तर्कशुद्ध टोकदार असा विरोध करणाऱ्यांचं नेहरूंना प्रचंड कौतुक होतं. लोकशाही ही त्यांची प्रेरणाच होती. आज भाजपापासून ते शिवसेनेपर्यंत अनेक पक्ष दुबळ्या काँग्रेसवर आणि नेहरू घराण्यावर उच्चखाने टीका करू शकतात. याचं कारण नेहरूंची ती लोकशाहीवादी दृष्टी होती. अन्यथा ती परंपरा राक्षसी राजकीय शक्तीच्या बळावर नेहरू तेव्हाच खच्ची करू शकले असते! याची समज भारतातल्या फार थोड्या राजकीय पक्षांना आहे. शिवसेनेला तर ती अजिबात नाही.

बाळासाहेबांनी (ते व्यक्ती म्हणून कलावंत, उमदे असले तरीही) शिवसेनेच्या माध्यमातून राजकीय असहिष्णुता महाराष्ट्रात आणली. ज्याला ते स्वतः कडवेपणा म्हणतात! त्या असहिष्णुतेचा आज वृक्ष झालेला आहे. म्हणजे खुद्द शिवसेनेतल्या आणि शिवसेना सोडून बाहेर गेलेल्या सर्वांमध्ये (अपवाद वगळता) विरोधकांविषयी आणि स्वतःवर राजकीय टीका करणाऱ्यांविषयी तीच तिरमिऱ्या रागाची आणि असहिष्णुतेची भावना असते. फक्त प्रतिक्रिया व्यक्त करण्याची पद्धत वेगळी असेल, तेवढीच. म्हणजे नारायण राणे, गणेश नाईक, छगन भुजबळ यांना विरोधकांविषयी आणि टीका करणाऱ्यांविषयी जेवढी 'आस्था' असते तेवढीच 'आस्था' स्वतःवर टीका करणाऱ्यांबद्दल आणि स्वतःच्या राजकीय विरोधकांबाबत उद्धव ठाकरेंना असते. मध्यंतरी वसई भागात स्वतःवर टीका करणाऱ्यांवर 'तंगड्या तोडू, बघून घेऊ' अशी भाषा गणेश नाईकांनी वापरल्याचं वृत्तपत्रांत छापून आलं होतं. त्या अर्थाने पक्ष सोडून गेलेले नारायण राणे आणि पक्षाचे कार्याध्यक्ष असलेले उद्धव ठाकरे या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहे. या सर्वांमध्ये स्वभावानुसार आणि प्रकृतीनुसार प्रतिक्रिया देण्याची पद्धत वेगळी असली तरी विखाराची भावना तीच असते! आपले विरोधक, टीकाकार परस्पर मरून जातील तर बरे. न पेक्षा त्यांच्यावर करणी वगैरे करता येईल तर उत्तम. अगदीच नाही तर आपल्याकडे अनिर्बंध सत्ता आली की, त्यांना आपण बघून घेऊच, अशी शिवसेना पिंडाची मूळ भावना असते. नेहरूंनी हा देश घडवताना हाच विचार केला असता तर आज आपण कुठे असतो? याचा विचार यांच्या मनातही येत नाही?

**शिवसेनेतल्या आणि शिवसेना सोडून बाहेर गेलेल्या सर्वांमध्ये (अपवाद वगळता) विरोधकांविषयी आणि स्वतःवर राजकीय टीका करणाऱ्यांविषयी तीच तिरमिऱ्या रागाची आणि असहिष्णुतेची भावना असते. फक्त प्रतिक्रिया व्यक्त करण्याची पद्धत वेगळी असेल, तेवढीच.**


या असहिष्णुतेचा पाया बाळासाहेबांनीच महाराष्ट्रात घातलेला आहे. आज नारायण राणेंवर टीका झाली की, शिवसेना नेतृत्वाला आनंद होतो, परंतु कृष्णा देसाई ते श्रीधर खोपकर यांचे विषय त्यांना नको असतात. जणू काही ती माणसं नव्हतीच. त्यांना कुटुंबं नव्हती. त्यांनी अक्रोश केला नव्हताच. शिवसेना तिच्या मूळ रूपात असताना इतकी असहिष्णू होती की, आपल्यावर टीका करणारी, विरोध करणारी प्रत्येक शक्ती फिजिकली आपणच नष्ट केली पाहिजे. असं प्रत्येक शिवसैनिक मानत असे. हा 'प्रोग्रॅम' स्वतः बाळासाहेबांनीच त्यांच्या डोक्यात फिट केलेला होता. आजही शिवसेना राजकीयदृष्ट्या तितकीच असहिष्णू आहे. फक्त व्यक्त होण्याचे नवे राजकीयदृष्ट्या सोयीस्कर मार्ग तिने शोधून काढलेले आहेत.

असहिष्णुता दोन मोठ्या दोषांना जन्म देतेच देते. एक म्हणजे दांभिकता आणि दुसरा म्हणजे निर्मितीक्षमतेचा अभाव. कुठलाच माणूस, कुठलीच संघटना, कुठलीच व्यवस्था परिपूर्ण असत नाही. ती परिपूर्णता विरोधक आणि टीकाकार तिला देतात. तुकाराम महाराज 'निंदकाचे घर असावे शेजारी' असं म्हणाले होते ते काय उगाच? अनेक त्रुटी असूनही लोकशाही व्यवस्था परिपूर्ण मानली जाते ती यामुळेच. परंतु आपण एक ते बरोबर, शुद्ध, अचूक हे मानणारी संघटना आणि व्यक्ती ही फक्त सत्ताकांक्षी असते आणि मुदलात हे गृहितक निसर्गतःच खोटे असल्यामुळे प्रचंड दंभ त्या संघटनेत आणि व्यक्तीत निर्माण होतो. इतरांचा द्वेष करण्यातच तिची ऊर्जा खर्च होते. ज्यायोगे नवीन काही निर्माण करण्याची शक्तीच ती गमावते. बाळासाहेबांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शिवसेनेने मराठी माणसांसाठी काय निर्माण केले? वगैरे प्रश्न काहींनी निर्माण केलेले आहेत. महाराष्ट्राची म्हणून एक संस्कृती आहे आणि त्यातून काही निर्माण केले पाहिजे हा शिवसेनेचा विचारच नव्हता, आणि नाही. तर ''कुठल्यातरी असुरक्षिततेत आपण सारे सापडलो आहोत तिथे संरक्षण देण्यासाठी आम्ही अवतरलो आहोत त्यामुळे आम्हाला बळ देणे हे रयतेचे कर्तव्य आहे. त्यासाठी तुम्ही आपले रक्त, घाम, अश्रू, धन सारे संघटनेला द्या. संघटना तुमचे रक्षण करेल.'' ही शिवसेनेमागची मूळ संकल्पना आहे. नुसती संकल्पनाच नव्हे तर बाह्यस्वरूप बदललं तरी हीच शिवसेना आहे. बाळासाहेबांनीच ती निर्माण केलेली आहे. तेसुद्धा ती बदलू शकत नाहीत. कारण शिवसेनेचे हे निर्मितीतत्त्व हेच तिचे अस्तित्व आणि प्राणतत्त्व आहे. त्यामुळे मराठीसंदर्भात आहे ते टिकवणे आणि हिंदुत्वासंदर्भात 'शत्रूंचे' निर्दालन करणे हीच शिवसेनेची भूमिका आहे. हाच शिवसेनेचा एकमेव कार्यक्रम आहे. हे करताना असहिष्णुता, दांभिकता, निर्मितीहीनता हे तिन्ही दोष शिवसेना टाळूच शकत नाही. त्यामुळे यांचे मराठीपण किती खरे? हिंदुपण किती खरे? प्रश्न यांच्या मित्रांनाही पडतात. पूर्वी शिवसेनेच्या दहशतीमुळे आणि आता बाळासाहेबांच्या ज्येष्ठत्वाकडे बघून ज्याने-त्याने हाताची घडी तोंडावर बोट ठेवलेले आहे. पण जसे आंधळ्याला सूरदास म्हटल्याने जशी वस्तुस्थिती बदलत नाही तसंच शिवसेनेला नवनवीन विशेषणांनी सुशोभित केल्याने वस्तुस्थिती बदलणार नाही.

मुळात मराठी असो किंवा अजून कुठली असो, संस्कृती ही वाढते

किंवा ऱ्हास पावते. चंद्राप्रमाणे तिची अवस्था असते. ती टिकवता येत नाही. एक तर तिच्यात वृद्धी होते वा तिचा ऱ्हास होतो. मुंबईत मराठी माणूस (म्हणजेच त्याची संस्कृती) शिवसेना असतानासुद्धा ऱ्हास पावत राहिली याचं कारण हेच आहे. कारण टिकवता येतात त्या गोष्टीत संस्कृती येत नाही. असहिष्णुता ही अशाच प्रकारचा दांभिकपणा निर्माण करते. बरेचजण बोलताना मुंबईत मराठी संस्कृती बाळासाहेब व शिवसेनेमुळे टिकली असं म्हणता म्हणता पुढे पण आता मुंबईत मराठी संस्कृती उरलेली आहेच कुठे? असं म्हणायला बाध्य होतात ते यामुळेच! यातला जो अंतर्विरोध आहे तो रोज बोलण्यात असूनही आपण त्याच्याकडे दुर्लक्ष करतो. आपल्या मनावर बाळासाहेब, त्यांच्या सभा, त्यांना भेटायला येणारे व्ही.व्ही.आय.पी. यांचे दडपण आपल्या मनावर येते. पण सत्य आणि संख्या यांचा काही संबंध असतोच असं नाही. त्याच वेळेला सत्य आणि व्ही.व्ही.आय.पी. यांचा काही संबंध असतो असंही नाही. हे म्हणजे, शतक झाल्यावर सचिन तेंडुलकर वर बघून देवाला नमस्कार करतो. (इतरही बरेच व्ही.व्ही.आय.पी. असं करतात) म्हणून देव वर असतो असं मानण्यासारखं आहे!

वास्तवात पृथ्वी गोल आहे. आकाश आपल्या चहूबाजूला आहे. ते खालीही आहे. देव आकाशात असेल तर खाली बघूनही नमस्कार केला तरी चालू शकते! तो मनातही आहेच. मनातल्या मनात नमस्कार केला तरीही चालू शकते. परंतु सचिनकडे बघून देव वरच आहे. अशी आपली श्रद्धा निर्माण होते! समाजाची विचार करण्याची ही पद्धत खूप घातक आहे. लता मंगेशकर, बाबासाहेब पुरंदरे, दिलीप वेंगसरकर वगैरे वगैरे माणसं महान आहेत. त्यांच्या क्षेत्रातले ते दिग्गज आहेत. बाळासाहेब स्वतः महान आहेत. (ते त्यांचे मोठेपण कशात आहे या लेखकानेही इतरत्र लिहिलेले आहेच.) पण याचा अर्थ त्यांच्या पायावर ही दिग्गज मंडळी पडतात आणि त्यांना सगळे मानतात म्हणून त्यांना देवत्व बहाल करणं चुकीचं आहे. अगदी गांधीजींच्या बाबतीतही हेच सत्य आहे. उलट त्यांच्या म्हणण्याची, विधानांची सतत चिकित्सा, समीक्षा होत राहणं हे समाजाच्या हिताचं आहे. माणूस ज्येष्ठ झाला की तो चुकत नाही का? की व्ही.व्ही.आय.पी. ज्याला मानतात तो सदासर्वकाळ बरोबरच असतो का? बाळासाहेबांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त मुंबईतल्या सर्व बिल्डरांना बिल्डिंगांमध्ये पन्नास टक्के (!) मराठी माणसं घेण्यासाठी दम दिलेला आहे. शिवसेनेची सत्ता महाराष्ट्रात होती तेव्हासुद्धा हे होऊ शकलं नाही. जैनांनी तर मुंबईत 'जैनं जयति शासनम्' म्हणत मुंबईच्या–महाराष्ट्राच्या छातीवर शंभर टक्के जैनांसाठी अनेक टॉवर्स उभारले. इतर अनेक परप्रांतियांनीही असंच केलं. खरं तर अनेक अमराठी बिल्डर शिवसेनेमुळेच पायांवर उभे राहिले! टिकवण्याची भाषा आणि निर्मिती करण्याची भाषा कशी भिन्न असते पाहा. हवेतलं विधान करायचं झालं तरी ''यापुढे मुंबईत पन्नास टक्के जमिनींवर मराठी माणसंच टॉवर उभारतील!'' असं म्हणणं आणि ''पन्नास टक्के मराठी माणसांना घरं अमराठी धनिक बिल्डरांनी, मुंबईत– महाराष्ट्राच्या राजधानीत द्यावीत!'' असं म्हणणं यातला फरकच हे तत्त्वज्ञान अधोरेखित करतं.



या संदर्भात लिहिण्यासारखं खरं तर खूप आहे. पण परत कधीतरी विस्ताराने. २००९ साल अजून खूप दूर आहे. उद्धव यांनी वडिलांना महाराष्ट्रात शिवसेनेची सत्ता आणण्याचं वचन दिलेलं आहे. ते भावनिक आणि प्रतीकात्मक अर्थानेच आपण घ्यायला हवं. असहिष्णुता, दांभिकता, निर्मितीहीनता ज्या भावनिक व प्रतीकात्मक अर्थाने आपण घेतो त्याच अर्थाने!

नाहीतरी बाळासाहेबांनी अमराठी बिल्डरांना दिलेला दम त्यांनी मनावर घेतला आणि आपल्या बिल्डिंगांतली पंचवीस टक्के घरे मिलिंद नार्वेकरांना आणि उरलेली पंचवीस टक्के घरं सुभाष देसाईंना दिली तर प्रतीकात्मक अर्थानं तेही पन्नास टक्के दान मराठी माणसांच्या पदरात पडेल की! शिवसेना आज आपला भावनिक मुद्दा आहे. उद्याही तो असेलच. कारण शेवटी शिवसेना ही आपल्यापासूनच बनलेली आहे. शेवटी आपला समाज, आपल्या संघटना म्हणजे आपणच. फरक फक्त एवढाच आहे की आपण शिवसेनेला जे दिलं ते भावनिक आहे अन् शिवसेनेने आपल्याला दिलं ते प्रतीकात्मक आहे!

*rajuparulekar@hotmail.com*